**सहायक कामगार आयुक्त, गट-अ (वेतनश्रेणी रु. ९३००-३४८०० + ग्रेड पे रु.५०००/-) या पदावर तात्पुरती पदोन्नती देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,**
**शासन निर्णय क्र.पदोन्न-२०१६/प्र.क्र.१७६/कामगार-८**
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दिनांक-२५ मे, २०१८.

<u>वाचा:</u> १) कामगार आयुक्त,मुंबई यांचे पत्र क्र.आस्था/सकाआ/पदो/१२१७/२१७२/ कार्यासन-२, दि.१२/१०/२०१७.
२) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२A/१६-ब, दि.२९/१२/२०१७.

**<u>शासन निर्णय:-</u>** कामगार आयुक्त, मुंबई यांच्या आस्थापनेवरील सरकारी कामगार अधिकारी, गट-ब संवर्गातील अधिका-यांच्या सेवाजेष्ठता यादीतील सेवाजेष्ठतेनुसार खालील १४ अधिका-यांना खुल्या प्रवर्गात सहायक कामगार आयुक्त, गट-अ (वेतनश्रेणी रु.९३००-३४८००+ ग्रेड पे रु.५०००) या पदावर या आदेशाव्दारे विहित अटींच्या अधीनतेने तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच संबंधित अधिका-यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या पदावर पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिका-याचे नाव व प्रवर्ग | ज्येष्ठता क्र. | पदोन्नतीने पदस्थापना करावयाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्री. वि.रा. लोखंडे , खुला | २७८ | अपर कामगार आयुक्त, नागपूर येथील रिक्त पदावर |
| २ | श्रीमती श.अ. पोटे, अ.जा. | २८२ | कामगार उप आयुक्त, औरंगाबाद कार्यालयातील श्री. कि.वि. दहिफळकर यांच्या बदलीने रिक्त पदावर |
| ३ | श्री. स.शि. चव्हाण, इ.मा.व. | २८३ | अपर कामगार आयुक्त, पुणे कार्यालयातील रिक्त पदावर |
| ४ | श्री. म.पां. पाटील, खुला | २८४ | कामगार आयुक्त, मुंबई कार्यालय-आर वॉर्ड |
| ५ | श्री. चे.बा. जगताप, खुला | २८५ | कामगार उप आयुक्त, पुणे कार्यालयातील रिक्त पदावर |
| ६ | श्री. प्र. बा. जाधव, खुला | २८६ | कामगार आयुक्त, मुंबई कार्यालय-जी साऊथ वॉर्ड |
| ७ | श्री. ग.स. शिंदे, खुला | २८७ | कामगार आयुक्त, मुंबई कार्यालय-पी १/२ वॉर्ड |
| ८ | श्री. अ.उ. कुटे, भ.ज./ड | २८९ | सहायक कामगार आयुक्त, अमरावती या रिक्त पदी |
| ९ | श्री. उ.सु. लोया, खुला | २९० | सहायक कामगार आयुक्त, चंद्रपूर या रिक्त पदी |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | श्री. सु.तु. शिर्के, खुला | २९१ | कामगार उप आयुक्त, नाशिक कार्यालयातील श्री. इळवे यांच्या पदोन्नतीने रिक्त होणा-या पदावर |
| ११ | श्री. य.सु. पडीयाल, भ.ज./ब | २९२ | कामगार उप आयुक्त, औरंगाबाद कार्यालय येथील श्री. व्ही. एस.मेश्राम यांच्या सेवानिवृत्तीने रिक्त पदावर |
| १२ | श्रीमती शि.स. कुलकर्णी, खुला | २९३ | कामगार आयुक्त, मुंबई कार्यालय- कार्यासन १ व २ |
| १३ | श्री. द.दा. पवार, खुला | २९४ | सहायक कामगार आयुक्त, भंडारा या रिक्त पदी |
| १४ | श्री. दि.सं. दाभाडे, अ.जा. | २९५ | सहायक कामगार आयुक्त, भिवंडी या रिक्त पदी |

२. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दि.०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. याबाबत विधी व न्याय विभागाने दि.२८/१२/२०१७ रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार खुल्या प्रवर्गातील कर्मचा-यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक अडचण नसल्याचे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार तूर्तास पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात यावीत. अशी कार्यवाही करताना सेवाज्येष्ठता यादीमधील मागावर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी ते दि.२५/०५/२००४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावी, अशा सूचना सा.प्र.वि./कार्यासन १६-ब ने दि.२९/१२/२०१७ च्या पत्रान्वये दिल्या आहेत.

त्यानुसार सदर सरकारी कामगार अधिकारी, गट-ब यांना सहायक कामगार आयुक्त, गट-अ पदावरील पदोन्नती मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे.

३. सदर सहायक कामगार आयुक्त पदावरील पदोन्नती उक्त अधिका-यांना त्यांच्याविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी प्रलंबित अथवा प्रस्तावित नाही या धारणेच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

४. संबंधित सरकारी कामगार अधिकारी यांनी सहायक कामगार आयुक्त पदावरील पदोन्नती न स्विकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.१२/०९/२०१६ नुसार त्यांचे नाव सन २०१६-१७ च्या निवडसूचीतून काढून टाकण्यात येईल व पुढील दोन वर्षी होणा-या निवडसूच्यांमध्ये त्यांच्या नावाचा विचार न करता तिस-या वर्षाच्या निवडसूचीत सहायक कामगार आयुक्त पदावरील पदोन्नतीसाठीची पात्रता तपासण्यात येईल.

५. हे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.५६७ अे/१७/१६-ब, दि.२०/०६/२०१७ आणि क्र.१७०/का.१२, दि.०९/०२/२०१८ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०५२५११५३०७१२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Gupte Sanju Kamlakar

Digitally signed by Gupte Sanju Kamlakar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2834863d93dd5ba34736e8845b6287c3dd58ee176cf2b893df4e169e70699c59, serialNumber=4c10e808fe85223e03be4cad0148cef9a71914878680c586fc438e7239dafca4, cn=Gupte Sanju Kamlakar
Date: 2018.05.25 11:51:30 +05'30'

**( संजु क. गुप्ते )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत –**

१. मा. मंत्री (कामगार ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री (कामगार ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव (कामगार ) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
४. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. विकास आयुक्त (असंघटीत कामगार), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. सह कामगार आयुक्त, मुंबई
७. अपर कामगार आयुक्त, मुंबई / पुणे / नागपूर.
८. कामगार उप आयुक्त (प्रशासन), कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई
९. कामगार उप आयुक्त ठाणे/नाशिक/औरंगाबाद/पुणे/रायगड.
१०. सर्व संबंधित अधिकारी- (द्वारा कामगार आयुक्त,मुंबई )
११. महालेखापाल, (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),१/२,महाराष्ट्र ,मुंबई/नागपूर.
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३. सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
१४. निवड नस्ती ( कामगार -८)